# भारतीय जनता पक्ष

(केंद्रिय कार्यालय)

11, अशोक रोड, नवी दिल्ली- 110001

फोनः 011-23005700, फॅक्स- 011-23005787

<u>प्रसिद्धिसाठी</u>

भाजपचे वरिष्ठ नेते बलबीर पुंज यांनी भारतीय रेल्वेच्या मॅनेजमेंट आणि आर्थिक सेट-अप चे दोन भागात विभाजन करण्याची मागणी केली आहे. एक विभाग फक्त कमर्शियल कामकाजावर नियंत्रण ठेवणे आणि दुसरा विभाग सामाजिक, राष्ट्रीय आणि व्युहात्मक बाबींवर ध्यान ठेवील.

राज्यसभेत रेल्वे बजेट विषयीच्या चर्चेत भाग घेणारे बलबीर पुंज यांनी सांगितले की सामाजिक आणि व्यहात्मक महत्त्व लक्षात घेता रेल्वे प्रोजेक्टचे सामान्य बजेट मधून आर्थिक विभाजन झाले पाहिजे. पुंज यांनी पुढे सांगितले की चीन ने स्वताचे नेटवर्कचे भारत-चीनच्या सीमेवर गेल्या काही दिवसांपासून विस्तार केला आहे. दुसरीकडे भारतीय सीमेवर रेल्वे कनेक्टीवीच नाही. त्या विस्तारात रेल्वे कनेक्टीवीटी नसल्याने आर्थिक प्रवृत्तींवर मोठा परिणाम होत आहे. विकासाचे गोड फळ दुर्गम पहाडी विस्तारात राहणा-या लोकांपर्यंत अजुन पोहोचलेच नाही. त्यामुळे त्या विस्तारात देशाच्या इतर भागाबरोबर संचार होत नाही असे वाटतो.

भारत आणि चीन दरम्यान कदाचीत दुश्मनी झाली तर चीनच्या लष्करी दलाला शस्त्रास्त्र पुरवठा पोचवण्यासाठी तेथील रेल्वेचा जितका फायदा त्यांना मिळेल तितका फायदा आपल्या लष्करी दलाला मिळणार नाही.

पुंज यांनी सांगितले की केंद्र सरकारला देशाच्या अंतर्गत विस्ताराला रेल्वेच्या मुख्य धारेने जोडण्यासाठी वर्तमान आणि आगामी पंचवर्षीय योजने अंतर्गत सामान्य बजेट मार्फत आर्थिक विभाजन करावे लागेल.

पुंज यांनी सांगितले की रेल्वे बजेट युपीए सरकारने समग्र रेल्वेव्यवस्थेची गाडी पटरीवर आणण्यासाठी आणखी एक संधी मिळाली. परंतु दुर्दैवाने सरकारने ती संधी गमावली. रेल्वेमंत्र्यांनी कट आणि पेस्ट बजेट सादर केल्याचा आरोप करत त्यांनी सांगितले की रेल्वेमंत्र्यांच्या वक्तव्यात दीर्घदृष्टीचा अभाव आणि रेल्वेला पुन्हा एकदा सक्षम बनवण्याचा अभाव दिसून येतो. त्यांनी पुढे सांगितले की युपिए-1 आणि युपिए -2 सरकारने सादर केलेला रेल्वे बजेट मध्ये तीन मुद्दे एकसारखेच आहेत.

ते म्हणाले की एक मुद्दा रेल्वे बजेट मध्ये दिलेल्या वचनांपैकी आहे. दुसरा मुद्दा दोन्ही बजेटमध्ये कित्येक नवे विभाग स्थापन करणे आणि नवे प्रोजेक्ट सुरु करण्याबाबतचा आहे.

पुंज यांनी आक्षेप केला की, विद्‌यमान रेल्वे मंत्र्यांनी पाच अशा योजना बजेट मध्ये सादर करण्यात आल्या आहेत की ज्या आधीच्या रेल्वेमंत्र्यांनी पण सादर केलेल्या आहेतः

1) इन्टरनेट द्वारे तिकीट बुकिंग सुविधेचा अवधी जून-2010 मध्ये ममता बॅनर्जींनी केली होती.
2) मोबाईल फोनवरुन तिकीट बुकिंग सुविधा देण्याचे लालूप्रसाद यादव यांनी जाहीर केले होते.
3) कोड-139 द्वारे रिझर्वेशन करिता एसएमएस अलर्टची व्यवस्था आणण्यासाठी ममता बॅनर्जी यांनी 2009-10 मध्ये जाहीर केले होते.
4) अत्याधुनिक ई-तिकीट रिझर्वेशन सिस्टम आणण्यासाठी 2012-13 मध्ये रेल्वे मंत्री मुकुल रॉय यांनी केली होती.
5) ट्रेनमध्ये इलेक्ट्रॉनिक डिस्प्ले बोर्ड लावण्याचे 2008-09 मध्ये लालूप्रसाद यादव यांनी जाहीर केले होते.

पुंज यांनी पुढे सांगितले की घसारा अनामत फंड मध्ये कपात करण्यात आल्याने रेल्वे सेवेत गुणवत्ता तसेच प्रवाशांच्या सुरक्षेवर मोठा परिणाम होईल.

या कटॅगरीत जुने पूल, रेल्वेलाईन तसेच जीर्ण झालेले उपकरण बदलण्याचा समावेश आहे. त्यांनी आणखी सांगितले की सिग्नल आणि कम्युनिकेशन नेटवर्कमध्ये रु. 943 करोडची कपात करण्यात आली आहे. रेल्वेलाईन नविनीकरणासाठी राशीत रु. 551 करोड आणि पुलाच्या दुरुस्तीसाठीच्या राशीत रु.124 करोडची कपात करण्यात आले आहे. ट्राफिक सुविधेकरिताच्या राशीत पण रु.120

करोड रुपायाची कपात करण्यात आली आहे. या सर्व कपातीमुळे रेल्वे नेटवर्क आणि प्रवाशांच्या सुरक्षेवर प्रतिकुल परिणाम होईल.

कुंभमेळ्या वेळी अलाहाबाद रेल्वे स्टेशनवर चेंगराचेंगरी मुळे झालेल्या दुर्घटनेचा मुद्दा उचलून त्यांनी सांगितले की या दुर्घटनेकरिता रेल्वे जबाबदार आहे. दुर्घटनेत मारले गेलेल्या लोकांचा अपघाती मृत्यू ओढवला नाही तर त्यांची हत्या झाली आहे.
पुंज यांनी रेल्वे मंत्र्यांना विचारले की कुंभमेळ्यापूर्वी रेल्वेच्या व्यवस्थेविषयी माहिती घेण्यासाठी तुम्ही अलाहाबाद रेल्वे स्टेशनला गेला होता खरे?
त्यांनी रेल्वे बजेट विभाजनाचे विश्लेषण केले आणि सांगितले की पासून आतापर्यंत माल दर मध्ये 450 इतकी वाढ करण्यात आले आहे. ज्यामुळे महागाईवर मोठा परिणाम झाला आहे. इंधन दर वाढ झाल्याने खास करुन स्टील, कोळसा, सीमेंट दर वाढतील.

स्वातंत्र्यावेळी भारतात 53,000 किलोमीटर रेल्वेलाईन होती. त्यानंतर 65 वर्षात देशाला फक्त 13,000 किलोमीटर अधिक रेल्वेलाईन मिळाली. दुसरीकडे चीनने इतक्या कालावधीत 70,000 किलोमीटर रेल्वेलाईन टाकली.